**प्रेस नोट**

जळगांव शहर पो.स्टे.
दि.11 /09 /2025

प्रति.

**मा.संपादक सो.**

दैनिक -------------

**विषय - जळगांव शहर पोलीस गुन्हे शोध पथकाची उल्लेखनीय कामगीरी अवैध शस्त्र बाळगारे अटटल गुन्हेगार जेरबंद**

जळगाव शहर पोलीस स्टेशन हददीत दि. 11/09/2025 रोजी सकाळी 04.15 वा चे सुमारास जळगाव शहरातील गेंदालाल मिल दुध फेडरेशन कडे जाणा-या रोडवर सुरेशदादा जैन यांचे बंगल्यासमोर आरोपी नामे 1) युनुस उर्फ सददाम सलीम पटेल वय - 33 वर्ष. रा. गेंदालाल मिल जळगाव, 2) निजामोददीन शेख हुसेनोददीन शेख वय -31 वर्ष,रा. आझाद नगर जळगाव, 3) शोएब अब्दुल सईद शेख वय 29 वर्ष, रा गेंदालाल मिल जळगाव, 4) सौहिल शेख उर्फ दया सी आय डी युसुफ शेख वय- 29 वर्ष, रा शाहु नगर जळगाव हे गुन्हा करण्याच्या उददेशाने गावटी बनावटीचे पिस्टल जिवंत काडतुस व मॅगझिनसह गैरकायदा परवाना शिवाय आपल्या कब्जात बाळगतांना मिळुन आले म्हणुन त्यांचे विरुध्द जळगांव शहर पोलीस स्टेशन ला फिर्यादी नामे - पोकॉ/131 प्रणय सुरेश पवार नेम जळगांव शहर पोलीस स्टेशन यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.नं. 339/2025 भारतीय हत्यार कायदा कलम - 3/25 मो.वा.अधि. कलम - 3(1),181 , 3/181प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे

**गुन्हे शोध पथकातील अंमलदार सफौ/38 सुनिल दामोदर पाटील, पोहेकॉ/2611 सतीष रमेश पाटील, पोकॉ/3245 अमोल ठाकुर व पोकॉ/**131 **प्रणय पवार** असे पो .स्टे.हद्दीत रात्रगस्त करीत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की गेंदालाल मिल परीसरात सुरेश दादा जैन बंगल्या समोर रोडवर काही इसम एका कारमध्ये संशयीतरित्या अवैध शस्त्र बाळगुन फिरत आहे अशी माहीती प्राप्त झाल्याने त्याबाबत मा.पो.नि.सागर शिंपी यांना माहिती कळविली असता त्यांनी संपुर्ण डी. बी. स्टॉफ यांना बातमीची खात्री करण्यासाठी सदर घटनास्थळी रवाना केले. सदर घटनास्थळावर आम्हास एक कार दिसुन आल्याने तिस आम्ही थांबविली. सदर कार मध्ये चार इसम हे संशयीत रित्या मिळुन आल्याने व त्यांना विचारपुस करता सुरवातीला त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले. त्यांना पोलीसी खाक्या दाखविले असता त्यांनी गावठी पिस्टल व जिवंत काडतुस असल्याचे कबुली दिली. त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे 1) युनुस उर्फ सददाम सलीम पटेल वय 33 वर्ष, रा. गेंदालाल मिल जळगाव, 2) निजामोददीन शेख हुसेनोददीन शेख वय 31 वर्ष,रा. आझाद नगर जळगाव, 3) शोएब अब्दुल सईद शेख वय 29 वर्ष, रा गेंदालाल मिल जळगाव, 4) सौहिल शेख उर्फ दया सी आय डी युसुफ शेख वय 29 वर्ष, रा शाहु नगर जळगाव अशी नावे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता, इसम नामे युनुस उर्फ सददाम सलीम पटेल याचे कडुन **एक पिस्टल व त्यात 04 जिवंत राउंड तसेच कारची झडती घेतली असता कारमध्ये 01 पिस्टल व 06 जिवंत राउंड तसेच 01 खाली मॅगझिन व मारुती सुझुकी कंपनीची कार क्र. एम.एच. 43 ए.आर 9678 असा एकुण 1,78,000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हा त्यांच्या कडुन हस्तगत करण्यात आला.**

**युनुस उर्फ सददाम सलीम पटेल वय 33 वर्ष, रा. गेंदालाल मिल जळगाव,याचे विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

| अ. क्र. | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि. नंबर व कलम | सद्यास्थिती |
|---|---|---|---|
| 1 | जळगाव शहर पोलीस स्टेशन | 150 / 2023 भा. शस्त्र अधि. कलम 3 / 25 | को. पे. |
| 2 | जळगाव शहर पोलीस स्टेशन | 318 / 2023 भा. शस्त्र अधि. कलम 3 / 25 | को. पे. |
| 3 | जळगाव शहर पोलीस स्टेशन | 203 / 2025 भा. न्या. सं. कलम 125, 125ब, सह भा. शस्त्र अधि.कलम 3 / 25, 5 / 25, 27 | को. पे. |
| 4 | भुसावळ रेल्वे पोलीस स्टेशन | 331 / 2017 भा. द. वि.34 | को. पे. |
| 5 | जळगाव तालुका पोलीस स्टेशन | 110 / 2055 भा. द. वि. कलम 302,120ब, 143, 147 | को. पे. |

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक, श्री माहेश्वर रेड्डी सो. मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो. अशोक नखाते, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.नितीन गणापुरे सो. मा. पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांचे मार्गदर्शनाखाली जळगांव शहर पो.स्टे.च्या गुन्हे शोध पथकातील सफौ/सुनिल पाटील, पोहेकॉ/उमेश भांडारकर, पोहेकॉ/सतिश पाटील, पोहेकॉ/नंदलाल पाटील, पोहेकॉ/योगेश पाटील, पोहेकॉ/विरेंद्र शिंदे,पोहेकॉ दिपक शिरसाठ, पोहे.कॉ. /भगवान पाटील, पोकॉ.प्रणय पवार, पोकॉ.अमोल ठाकुर, पोकॉ/भगवान मोरे व पोकॉ.राहुलकुमार पांचाळ अशांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरेश आव्हाड, सहा. पोलीस निरीक्षक हे करीत आहे.


शहर पोलीस स्टेशन